The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# महानुभाव साहित्यः काल, आज आणि उद्या

**डॉ. एम. ए. कव्हळे**
प्रोफेसर, मराठी विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

बाराव्या तेराव्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये विविध धर्मसंप्रदाय निर्माण झाले. नाथ, महानुभाव आणि वारकरी संप्रदायाचा या काळामध्ये उद्भव आणि पुनरुज्जीवन झाल्याचे आढळून येते. हा कालखंड मराठी संस्कृतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या कालखंडामध्ये निर्माण झालेला महानुभाव संप्रदाय हा मराठी संस्कृतीच्या प्रचार व विस्तारासाठी अतिशय महत्त्वाचा असून या कालखंडातील नाथ आणि वारकरी संप्रदायाइतकेच महानुभाव संप्रदायाचे कार्यही महत्वपूर्ण आहे. जीवनाचे अंतिम सत्य अनुभवानेच समजून घ्यायचे असते असे मानून ज्याच्या पाठीशी मोठा अनुभव त्याला महत्त्व देणारा, महान अनुभव घेणारा महानुभाव संप्रदाय चक्रधर स्वामींनी स्थापन केला. आज या संप्रदायाचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दाहीदिशांना झालेला दिसतो. चक्रधर स्वामींनी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षामध्ये झालेली रूपांतर पाहून मन थक्क होते. आज गावगाड्या, वस्ती वाड्यापासून ते शहरापर्यंत सर्वत्र या संप्रदायाचा विस्तार झालेला दिसतो.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये महानुभाव साहित्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज 21 व्या शतकातही या साहित्याचा प्रभाव मराठी जनमानसावर दिसून येतो. मराठी भाषेतून साहित्य निर्मिती केल्यामुळे मराठी भाषिक माणसावर बाराव्या तेराव्या शतकापासून आजपर्यंत महानुभाव साहित्याने अधिराज्य गाजवले आहे. लिळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र, दृष्टांतपाठ, सूत्रपाठ यासारख्या गद्यग्रंथापासून या साहित्य निर्मितीला सुरुवात झाली. तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय जीवनाची वैशिष्ट्ये, जीवनामध्ये घडणाऱ्या घडामोडी, तत्कालीन माणसांच्या वृत्ती प्रवृत्ती यांचे दर्शन महानुभवांच्या गद्य साहित्यामधून होत असल्यामुळे या साहित्याला तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा दस्ताऐवज म्हटले तरी वावगे ठरणार नाही. हे ग्रंथ फक्त महानुभाव धर्मपंथाचे तत्त्वज्ञानच मांडत नाहीत तर या संप्रदायाची कार्यपद्धती, त्याचे आचारविचार आणि तत्वज्ञान महानुभवीय गद्य साहित्यातून आपणास पहावयास मिळते. गद्य साहित्याबरोबरच महादंबेचे ढवळे आणि मातृकी रुक्मिणीस्वयंवर त्याचप्रमाणे सातीग्रंथ यामधूनही महानुभाव साहित्याने मराठी साहित्य संस्कृतीला समृद्ध केले आहे. महानुभाव साहित्य आणि मराठी माणूस यांचे नाते अजोड आहे. त्याचे कारण महानुभाव पंथाने मायबोलीला प्रतिष्ठेचे स्थान दिले, मराठी भाषेतूनच आपले तत्त्वज्ञान आणि आचारधर्म त्यांनी प्रतिपादित केला; त्यामुळे महानुभाव संप्रदाय महाराष्ट्रामध्ये अधिक प्रभावीपणे रुजल्याचे दिसून येते.
महानुभाव साहित्याने मराठी माणसाला काय दिले? याचा विचार केला तर आपल्या लक्षात येते की, या साहित्याने मराठी माणसाला जीवन कसे जगावे हे शिकवले. लौकिक आणि पारलौकिक जीवन जगण्याची वाटचाल कशी असावी याचे मार्गदर्शन या साहित्याने केले. लौकिक जीवन जगत असताना कोणकोणत्या गोष्टीचे भान ठेवायला हवे, कोणत्या गोष्टीला नकार द्यावा, कोणत्या गोष्टींचा स्वीकार करावा याचा विचारही मराठी माणसाच्या मनावर या साहित्याने बिंबविला. जीवनाचे अंतिम सत्य काय आहे?, जीवनाचे अंतिम ध्येय

काय आहे? हे सांगत असतानाच जीवनाची अंतिम फलश्रुती सुद्धा या साहित्याने मराठी माणसाला सांगीतली. त्याचबरोबर भक्ती म्हणजे काय?, भक्ती कशी करावी?, परमेश्वर नेमका कुठे आहे?, परमेश्वराला प्रसन्न करून घेण्याचे मार्ग कोणते आहेत? या सर्वांचे प्रतिपादन महानुभाव साहित्याने केलेले दिसून येते. सर्व प्राणीमात्र ईश्वराचाच अंश आहेत आणि त्यामुळे जीवनाच्या अंतिम समयी आपल्याला ईश्वरातच विलीन व्हायचे आहे हा सोपा भक्तीमार्ग महानुभाव संप्रदायाने सांगीतला. भक्त, साधू त्यासाठीच्या आचारधर्म, भक्तिमार्ग महानुभाव संप्रदायाने त्यांच्या साहित्यातून व्यवस्थितपणे मांडणी करत सांगितल्यामुळे मराठी माणसाला हा संप्रदाय आणि त्यांचे साहित्य जवळचे वाटते.

मानवाच्या जीवनाच्या अंतिम सत्याचा शोध घेणे हे मानवी जीवनासाठी अतिशय महत्त्वाचे असते. महानुभाव संप्रदायाने जीवनाच्या अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे समाजात तत्कालीन काळामध्ये वाढत चाललेला अविवेक आणि मद्याचा प्रसार याला महानुभाव साहित्याने प्रखर विरोध केला. आपण लीळाचरित्र ग्रंथ वाचला तरी कळेल की, यामध्ये चक्रधर स्वामी यांनी जत्रा, यात्रा, तीर्थयात्रा, नाना प्रकारची व्रत्तवैकल्ये यांच्याविषयी आपली प्रखर अशी मते मांडलेली आहे. समाजामध्ये विवेक निर्माण झाला पाहिजे, मद्याचा प्रसार थांबून चांगल्या गुणांनी युक्त माणसे समाजात राहिली पाहिजेत, सर्वत्र नीती, सत्य, थोडामोठ्यांना मानसन्मान, आदर या भूमिका निर्माण झाल्या पाहिजेत. त्यामुळेच महानुभाव संप्रदायाने माणसाच्या जीवन जगण्याच्या प्रक्रियेविषयी भाष्य केलेले आहे. त्याचबरोबर देवतांची उपासना करण्यापेक्षा परमात्म्याची उपासना करावी यावर महानुभव संप्रदायाने भर दिलेला आहे. देवता या बुद्ध आहेत त्या नित्यबद्ध असल्यामुळे त्या आपल्याला सुख देऊ शकत नाही. परमात्मा नित्यमुक्त आहे आणि आपण त्या परमात्म्याचा अंश आहोत; त्यामुळे आपण नेहमी परमात्म्याचीच पूजा करावी. जीव, प्रपंच, देवता, परमेश्वर या सूत्रपाठातील तत्त्वज्ञानातून महानुभाव संप्रदायाने विवेकी भक्तिमार्ग सांगीतलेला दिसून येतो. महानुभाव संप्रदायाने पंचकृष्ण मानले असले तरी कृष्ण हा एक पूर्ण अवतार आहे हेही त्यांनी स्पष्ट केलेले आहे. ज्ञानाला भक्ती ही पुरक आहे, आणि भक्तीला ज्ञान पुरक आहे अशी भूमिका या साहित्याने घेतल्याने विचार किंवा भावना यातील एकाकीपण नाहिसे झाले. म्हणूनच या साहित्याने डोळस भक्तीचा पुरस्कार केला. या डोळसपणाला ज्ञानाचे, सत्याचे, विवेकाचे भक्कम अधिष्ठान होते.

महानुभाव साहित्याचा आजच्या संदर्भात विचार करताना आपल्या लक्षात येते की, आजच्या काळातही या साहित्याची व साहित्यातील तत्त्वज्ञानाची गरज कायम आहे. विवेकनिष्ठा हे महानुभाव साहित्याचे अधिष्ठान असल्यामुळे आणि विवेकनिष्ठा त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन ही काळाची गरज असल्यामुळे जनसामान्याचे प्रबोधन करण्यासाठी आजच्या काळातही महानुभाव साहित्य अत्यंत महत्त्वाचे आहे. या साहित्याने विवेकनिष्ठेबरोबरच मानवता आणि विश्वात्मकता या दोन मूल्यांचा स्वीकार केलेला आहे. आजच्या धकाधकीच्या आणि जागतिकीकरणाच्या कालखंडामध्ये मानवता संपत चालली आहे. ‘हे विश्वचि माझे घर’ ही संकल्पना दूर होऊन माणूस एकाकी आणि एकलकोंडा बनत चालला आहे. अशा काळामध्ये समाजामध्ये मानवता रुजविण्यासाठी आणि विश्वात्मकता हे मूल्य जपण्यासाठी महानुभाव साहित्य गरजेचे वाटते. या साहित्याच्या संस्काराने मूल्यांची जोपासना होऊ शकते, विवेकनिष्ठ जीवनदृष्टी समाजाला दिली जाऊ शकते. त्यामुळे आजच्या काळामध्ये निर्माण झालेली विषमतेची बीजे जनमानसाच्या मनातून बाहेर काढले जाऊ

शकतात. एकसंघ समाज आणि एकसंघ विश्व ही आजच्या काळाची गरज आहे. माणूस कमालीचा प्रगत होत असताना कमालीचा अधोगतीकडे जात आहे. ही माणसाची अधोगती रोखण्यासाठी संत साहित्यासारख्या व महानुभाव साहित्यासारख्या साहित्याची समाजाला गरज वाटते. त्यामुळे आजच्या संदर्भामध्ये हे साहित्य निरोपयोगी नसून अत्यंत उपयोगी आहे असेच म्हणावे लागेल. समाजाला समाजविघातक प्रवृत्तीपासून वाचविण्यासाठी समाजहित जोपासणाऱ्या महानुभाव साहित्याची आज गरज आहे असे म्हणावे लागेल. आजच्या काळात दररोज बलात्कार, हिंसा, भ्रष्टाचार, शोषण यासारख्या समाज विघातक घटना घडताना दिसतात. यासाठी आपल्या समाजाचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. महानुभाव संप्रदायाने व महानुभाव साहित्याने इंद्रीय नियंत्रणाविषयीचे संस्कार जनसामान्यावर केलेले दिसतात. असे संस्कार आजच्या तरुण पिढीवर व एकूण समाजावर होणे गरजेचे आहे. महानुभाव साहित्याने सांगितलेला जीवनादर्श जर समाजाने स्वीकारला व महानुभव साहित्यात सांगितलेले संस्कार समाज मनावर झाले तर आजचा समाज हा परिवर्तनाच्या दिशेने जाऊन एक उदात्त समाजाची निर्मिती होऊ शकते. जातीभेद, विषमता या सर्वांच्या पलीकडे जाऊन एका आदर्श समाजाची निर्मिती करण्यासाठी आज महानुभाव साहित्यातील विचारांची अंमलबजावणी व महानुभाव साहित्यातील विचार आजच्या काळाची गरज आहे.

महानुभाव संप्रदायाने आजपर्यंत केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक कार्याचा विचार करता आजपर्यंतची या संप्रदायाची वाटचाल ज्या पद्धतीने सकारात्मक आहे त्याचपद्धतीने यापुढेही या संप्रदायाचा प्रभाव मराठी जनमानसावर राहील याबद्दल शंका नाही. या संप्रदायाने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये अतिशय मोलाची भूमिका बजावली असल्यामुळे हा संप्रदाय आजही तळागाळापर्यंत टिकून असलेला दिसून येतो. या संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार फक्त खेड्यापाड्यातच दिसून येत नाही तर शहरातही या संप्रदायाचा प्रभाव दिसतो. साधारणत: बाराव्या तेराव्या शतकात निर्माण झालेल्या या साहित्याचा आज विस्तार विविध रूपातून झालेला दिसतो. गेल्यास सात-आठ शतकापासून या साहित्याने मराठी माणसावर प्रभाव टाकत आज एकविसाव्या शतकामध्ये प्रवेश केला आहे. या संप्रदायाने व साहित्याने समाजाला केलेल्या मार्गदर्शनाचा विचार केला तर यापुढेही या संप्रदायाचा प्रभाव निश्चितच मराठी माणसावर राहील याबद्दल शंका नाही.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळामध्ये मानवी जीवनामध्ये प्रचंड गतिमानता आणि परिवर्तने होत आहेत. यामुळे याचा परिणाम साहित्यावर देखील होताना दिसतो. वैज्ञानिक प्रगती आणि प्रसारमाध्यमांचा प्रभाव पडून जीवनविषयक व धर्मविषयक निष्ठा पूर्णपणे नाहीशा होत आहेत की काय? असे वाटू लागले आहे; पण या निष्ठा पूर्णतः नाहीशा होतील असे वाटत नाही. आज आपण ज्या समाजामध्ये राहतो तो समाज मोठ्या प्रमाणामध्ये ग्रामीण भागामध्ये विखूरलेला आहे. ग्रामीण भागामध्ये आजही धर्मविषयक व संतविषयक निष्ठा जपल्या जाताना दिसतात. जीवनाच्या अनेक बाजू दु:ख, दारिद्र्य, दैन्य यांनी भरलेल्या असताना सुद्धा या अंधारामध्ये प्रकाश शोधणारा मराठी माणूस संत साहित्याकडे आशेने पाहताना दिसतो. विज्ञान आणि अध्यात्म दोन्हीही सत्याचाच शोध घेत असतात. मानवी जीवनाचे अंतिम सत्य शोधण्याचा प्रयत्न विज्ञान आणि साहित्य हे करत असते. त्यामुळे वैज्ञानिक प्रगती बरोबरच विश्वामध्ये नैतिकता, मानवता अबाधित राहणे महत्त्वाचे असते. वैज्ञानिक प्रगती झाली आणि मानवी जीवनच संपत असेल तर त्या वैज्ञानिक प्रगतीचा माणसाला काहीच

फायदा होणार नाही. त्यामुळे वैज्ञानिक सुद्धा अंतिम सत्याचा शोध घेत असताना शेवटी अध्यात्माकडे वळलेले दिसतात. एकविसाव्या शतकामध्ये वैज्ञानिकांना साहित्याचा आधार वाटावा हे साहित्याच्या प्रभावाचे द्योतक आहे. त्यामुळे महानुभाव साहित्यामध्ये नवनवीन संशोधन आणि विचार निर्माण होऊन त्यांचा प्रचार व प्रसार होणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ :
१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नसीराबादकर
२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ - अ. ना. देशपांडे
३. महानुभाव गद्य - शं. गो. तुळपुळे
४. दृष्टांत पाठ - संपादक शं. गो. तुळपुळे
५. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप - ह. श्री. शेणोलीकर
६. भारतीय भक्ती प्रवाह- संपादक मधुकर क्षिरसागर
७. संतांची सामाजिक दृष्टी - शंकरराव खरात
८. संतसाहित्यमीमांसा - संपादक ताहेर पठाण